# देवांचे मनोगत

## अशोक दामोदर रानडे

(मूळ प्रसिद्धी - महाराष्ट्र टाईम्स वर्तमानपत्र, संपा. द्वा भ कर्णिक, मुंबई, २० मे, १९७९)
(शब्दप्रधान गायकी, यशवंत देव, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, मूल्य १६ रु.)

यशवंत देव हे समर्थ संगीतरचनाकार आहेत, डोळस कवी आहेत आणि मनःपूर्वक शिकविणारे पण सुगम संगीतावरच्या आपल्या पहिल्या पुस्तकात देवांच्या या साऱ्या भूमिकांचे प्रतिध्वनी उमटले आहेत. भावगीत गायनाचे स्वरूप, गायकाचा अभ्यास, भावगीताचे प्रत्यक्ष गायन, कवितेतील गेयत्वाच्या खुणा, संगीतरचनाकाराचे गुण, सुगम संगीताचा अभ्यासक्रम, मराठी संगीतरचनाकारांच्या कृतींची त्रोटक पाहणी इत्यादी विविध अंगाची चर्चा सुमारे सव्वाशे पानांत करून देवांनी हा विषय किती गुंतागुंतीचा आहे हे नीटपणे ध्यानात आणून दिले आहे.

देवांनी सूर लावला आहे - शिक्षकाचा. विषय समजून देण्यासाठी सोपी उदाहरणे, चतुरोक्ती यांचा प्रशंसनीय आधार घेतला आहे. परंतु सारखी प्रत्यक्ष अनुभवांशी सांगड घातल्याकारणाने विवेचनास अलंकारिक बिनबुडीपणा आलेला नाही. त्यांचे 'आ'कार नीट लावण्याविषयीचे विवेचन (पृ. ९), गोडगोड बोलण्याच्या भरात निसटून जाणाऱ्या उच्चारांबद्दलची त्यांची चर्चा (पृ. १४) आरोह-अवरोहातीत शक्तिस्थाने सांभाळून गाण्याविषयीचा त्यांचा तपशील (पृ. २७) इ. अनेक ठिकाणची उदाहरणे इथे देता येतील.

प्रत्यक्ष अनुभवावर आधारलेले त्यांचे सर्व विवेचन सर्व बाबतीत वेधक उतरले आहे, कारण देवांची इथे या विषयाबाबत एक वैचारिक भूमिका पक्की झालेली दिसते. तसे नसते तर त्यांना फक्त 'चाली देणे' जमले असते. तात्त्विक भूमिकेचे वावडे न मानणारे संगीतकार ही बाब अजूनही आपल्याकडे बरीचशी दुर्मिळ आहे. म्हणून देवांचा हा विशेष मुद्दाम उल्लेखावयाचा, आणि याच कारणासाठी तपासावयाचाही. काही ठिकाणी अधिक तपशीलात विचार करायला हवा असे जाणवते.

उदाहरणार्थ, आवाज कमावण्यासाठी भावगीत गायकाने रागदारी गाणाऱ्यांसारखी मेहनत करावी असे ते सुचवितात. (पृ. ७) एक तर असे की सध्या रागदारीवाले जशी मेहनत करतात तशी म्हणजे काय हे त्यांनी स्पष्ट करायला हवे. कारण ते म्हणतात तसा निकोप इ. आवाज रागदारीवाल्यांत अपवादाने आढळतो! दुसरे म्हणजे ज्या शब्दप्रधान गायकीविषयी ते विवेचन करत आहेत त्यात 'आ'कारावर भर किती असतो? भाषिक स्वर फक्त 'आ' हाच असतो का? शब्दांत जे भाषिक स्वर असतात त्या सर्वांचाच विचार व्हायला नको का? खरे म्हणजे देवांच्या मनोगतातल्या शिक्षकाने शब्द या घटकाच्या उच्चाराचा थोडासा अधिक खोल विचार करायला हवा होता.

अनुकरण करू नये, आपल्या आवाजात गावे हा विवेक देवांनी ठाशीवपणे समोर मांडला आहे. पण इथेही त्यांनी अधिक पुढे जायला हवे होते. आवाजांच्या जातींविषयी त्यांनी अधिक तपशीलात जाऊन लिहायला हवे. अरुण दाते, सुधीर फडके, लता मंगेशकर, शोभा गुर्टू, माणिक वर्मा, वाणी जयराम या सर्व आवाजांना एकच संगीत चालेल काय? देवांनी आवाज वर किती नेता येतो याचा विचार केला आहे पण सर्व आवाजांनी समान तारता पातळीवर जाऊ नये हे त्यांनी ठासून का सांगितले नाही? खरे पाहता मायक्रोफोन हा आवाज-आवाजांतील व्यक्तित्वभेद स्पष्ट करणारा आहे हे आवर्जून सांगणाऱ्या देवांना हे अधिक जाणवायला हवे होते. सर्व प्रकारची गीते सर्व प्रकारच्या आवाजांत चांगली का लागत नाहीत याचे कारण सुटेपणाने पाहता आवाज वर पोचू शकतो की नाही यात शोधता कामा नये. तारता हे आवाजाचे फक्त एक परिमाण झाले. त्याचे अनन्यसाधारण महत्त्व जेव्हा सुक्ष्मध्वनिग्राहक नव्हता

तेव्हा, आता नव्हे. सूक्ष्मध्वनिग्राहक हा देव म्हणतात तसा रसिकराज नाही. तो एक नि:पक्षपाती, संवेदनशील घटक आहे, तो गुणांइतकेच दोषही 'मोठे' करून पोचवितो.

- **हार्मोनियमची पळवाट**

तंबोऱ्याच्या आधारे मेहनत करावी हा उत्तम पक्ष असे देव सांगतात हे संपूर्णतया योग्य. पण न जुळविता आल्यास हार्मोनियमचा एक सूर घेऊन बसल्यास चालेल असे म्हणण्यापेक्षा तंबोरा जुळवायला शिका असे देव का सांगत नाहीत? हार्मोनियममुळे एकदम सुराला भिडण्याचे गायकास जमत नाही हे त्यांनी पुढे नेमकेपणे सांगितले आहेच. मग हार्मोनियम चालेल ही पळवाट काढण्यात काय अर्थ? ध्वनिशास्त्रीय दृष्ट्या तंतुवाद्य व पत्तीचे वायुवाद्य यांनी फार निराळे वर्णपट मिळत असतात. त्यांत आणि आपल्या आवाजातील धरसोडीचा लगाव हा हार्मोनियमने आच्छादिला जातो. तेव्हा हार्मोनियम नकोच असे देवांनी सांगायला हवे होते.

आता देवांचा अभ्यासक्रम, एकंदरीने त्याची छाप भारदस्त वाटते. त्यात प्रत्यक्ष गायनाला महत्त्व दिले आहे हे अभिनंदनीय, तालांचा अभ्यास सुचविला आहे तेही योग्य. पण शास्त्रीय संगीतातला जो भाग ते अभ्यासार्थ म्हणून सुचवितात त्याचे प्रयोजन अनेक वेळा धूसर वाटते. उदाहरणार्थ श्रुती-ग्राम-सप्तक (पृ. १०८) ह्या साऱ्यांना आज कोणत्या अर्थाने सयुक्तिकता आहे. मेल, गणिती पध्दतीने राग निर्मिती इ.चा काय उपयोग? कारुण्यसूचक म्हणजे तोडी इत्यादि साचे शिकून संगीत रचनाकाराने पुन्हा नाटकी संगीताच्या कंटाळेपणात आडकावे हे योग्य आहे काय? दरबारी आडाणा इ. रागांची नावे ते कोणत्या पायावर अंतर्भूत करतात? माझे म्हणणे असे की रागांना लक्षणगीत, रागमाहिती या पातळीवर आणणे म्हणजे पाठांतर व मग विस्मरण या पाढ्यांना पुन्हा शिक्षणात आणणे होय. हे राग शिकवावेत ते त्यांतील चांगल्या रचनांचे गायन शिकवून त्यांचे व्याकरण सांगून नव्हे. एकंदरीने देवांच्या मनोभूमिकेत शास्त्रीय संगीताविषयी प्रेमद्वेष संबंध असावेसे वाटते. सत्य असे आहे की शास्त्रीय संगीताचा अभ्यास कोणत्याही प्रकारच्या संगीतकारास आवश्यक हे त्यांना पटले आहे पण या अभ्यासाच्या आधुनिक आशयाविषयी विचार करण्याचे त्यांनी टाळले आहे. शास्त्रीय संगीतेतर क्षेत्रातल्या संगीतकारांना शास्त्रीय संगीताचे संकट वाटते ते त्यांतल्या गुरुबाजीमुळे, वेळ काढूपणामुळे आणि पोथीनिष्ठ, व्याकरणनिष्ठ अध्यापनपध्दतीमुळे. देवांच्या अभ्यासक्रमाची या दृष्टिकोणातून फेरतपासणी व्हायला हवी.

- **वेधक परिशिष्ट**

देवांनी ज्यांची रवानगी परिशिष्टात केली आहे ती तिन्ही प्रकरणे महत्वाची आहेत आणि चांगली उतरली आहेत. आवडत्या-नावडत्या चाली व संगीतकार याविषयी त्यांचे विवेचन वेधक आहे. आवडी-निवडीपासून विश्लेषणापर्यंत पोचलेला कलाकार या वर्णनास देव पात्र ठरतात ते या भागात. अधिक तपशीलवार व बारकाईने एखादे गीत त्यांनी तपासले असते तर यात भर पडू शकली असती. पुन्हा देव लिहितील (आणि ते लिहिणार, कारण त्यांना शब्दांच्या विविध सामर्थ्यांची ओळख पटली आहे) तेव्हा त्यांनी तात्त्विक विवेचन अधिक तर्कपूत करावे, आपले अनुभव अधिक विस्ताराने मांडावे आणि दुसऱ्याचे अनुभव अधिक तपशीलवार व स्पष्टपणे तपासावे. पण त्यांनी इथेच थांबू नये. त्यांच्याच पुस्तकाने खरे म्हणजे आता त्यांना प्रश्न विचारले आहेत. देवांनी पट्टी चढी ठेवावी!

---